। न हि ज्ञानेनं सदृषं पवित्रमहि विद्यते ।

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

सन 2016 2017

Scanned with CamScanner

## मार्गदर्शिका

सौ. केंजळे मॅडम

## गट प्रमुखाची नावे

१. शितल विरकर

२. रेश्मा जाधव

3. स्नेहल जाधव

४. प्रियांका जाधव

५. मनिषा साळुंखे

Scanned with CamScanner

प्रकल्पाचे नाव

# सुंभ आणि पीळ

कादंबरीचे रसग्रहण

Scanned with CamScanner

## प्रस्ताविका

सुंभ आणि पीळ ही ल. सि. जाधव यांनी प्रस्तुत कादंबरी मार्च, २०१४ मध्ये प्रसिद्य झाली आहे. या कादेबरीत मांग समाजाचे अनेक पदरी जीवनरीतीचे वास्तव रूप उलगडून दाखवले आहे. मांग समाजाचे अनेक पदरी जीवनरीतीचे वास्तव रूप उलगडून दाखविले आहे. मांग समाजाच्या चालीरीती, त्याचं असहाय जगणं, अस्पश्यता, प्रथा परंपरांचे आंधळेपण, देवभोळेपण, अंधश्रद्धा, तरीही या सगळयाला समर्थपणे सामोरे जाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रबोधन, धर्मांतर चळवळ अशा अनेकविध प्रश्नांची उकल लेखकाने मांडली आहे. या कादंबरीत सवर्ण दलित संघर्ष फारसा रंगविला नाही. तर मांग व महार या जातीतील तेढ दाखवली आहे. संपूर्ण कादंबरी ही मातंगाच्या आंबूज या विशिष्ट बोलीभाषेत आहे. म्हणून हा एक सामाजिक दस्त झाला आहे.

Scanned with CamScanner

# रस ग्रहण

## 1. अदभूत रस

लेखक ल. सि. जाधव यांची सुंभ आणि पीळ ही कादंबरी २०१४ मध्ये प्रसिध्द झाली. मांग जातीच्या विदारे व वास्तव जीवनाचे नेमके चित्रण त्यांनी या कादंबरीत केले आहे. या जातीची दैन्यावस्था, प्रथा, परंपरा, चालीरिती, अंधश्रध्दा, लोकजीवन या सगळयाचे दर्शन लेखक घडवतात.

मांगुडयात आलेला महाभ्यंकर घुळी पोरांनी पकडला तो प्रसंग एखादी चित्रफीत पाहावी तशा चित्रस्पर्शी शब्दात लेखकाने शब्दबध्द केला आहे. एका रात्री एक दांडगा अन भयंकर आडदांड घुळी म्हणजे वळू मांगुडयात आला. परशा सिरप्या, गनप्या, आंब्या आणि धन्या या पाच पोरांनी हा वळू मोठया युक्तीने जेरबंद करून पिपरीच्या झाडाला बांधला. लोक त्याला खायला घालू लागले. पण त्याच्या शेणामुताच्या वासाने लोक हैराण झाले.

एकदा हे पाच जण मलिकबाबाच्या दर्ग्यात गांजा ओढत बसले होते तेव्हा गांजाच्या धुंदीत सिरप्याला नजरेसमोर घुळी दिसू लागला व तो म्हणला, देवाला सोडलेला घुळी देवाघरीच पाठवू आणि ही कल्पना सगळयांनी उचलून धरली.

Scanned with CamScanner

भर रात्री तीन वाजता तिघेही गुपचूप पिंपरीच्या झाडाखाली आले. सगळा गाव झोपला होता. घुळीला सोडून दोर हातात धरून सगळे जण चौदा कमानीखाली आले.तिथे म्हसोबा होता, पाणी होते.हे सगळे येताच पिंपळावरून गिधाडे, घारी, कावळयांनी कालवा केला.

एव्हाना सकाळ होत आली होती. सगळयानी मिळून बैल खाली पाडला. त्याची गर्दन वर करून वाय बांधले. हे सगळे उघडेभोप हैवान मुक्या जितराबावर जणू तुटून पडले होते. त्याच्या मुसक्या बांधल्याने तो हूं का चूं करत नव्हता. परशाने हळदभंडारा उगवत्या सूर्याकडे, म्हसोबाकडे फेकला, बैलाच्या व स्वत च्याकपाळावर लावला. बैलाच्या नरडयावर डोळे रोखले, दीर्घ श्वास घेउन जय मरिमाय म्हणत एकाच जबरदस्त घवात बैलाचे मुंडके तोडले. घारी गिधाडांचा भेसूर आवाज घुमू लागला. बैलाच्या रक्ताच्या चिळकांडया उडू लागल्या, परशाचे तोंड रक्ताने माखले. बैल धाड धाड उडू लागला. जीव जाता जाईना. सगळे निर्विकारवणे बघत होते. हळूहळू बैल शांत झाला. धुगधुगी बंद झाली. बैलाच्या मानेजवळ रक्ताचे थारोळे साचले. रक्ताचा चिखल झाला.

परशाने ओंजळीत बैलाचे रक्त घेउन म्हसोबाला नैवेद्य दिला.

पाचही हैवानांनी जय मरिमाता, जय लकामाय, जय खंडुबा राया असा जयघोष केला. परशाचे डोळे तांबडेभडक झाले.

प्रसंग भैसूर होता.

Scanned with CamScanner

सगळे कशाने तरी झपाटले होते.

जणू ते पाच दहा हजार वर्षापूर्वीचे आदिमानव होते.

परशा बोलू लागला, मी सात आठ बिलेड आनलेत. प्रथम बैलाचं कातडं सोलू, नीट सोला. तरच चांगला भाव येईल.

एखाद्या धडावर पाच सहा लांडगे तुटून पडावेत तसे हे रूमानदांडगे बैलाचा कातडं सोलू लागले नुसत्या आंडरपॅन्टवर असलेले रक्ताचे हात, शरीर भरलेले हे पाच जण प्रताला भूतं चिकटावीत तसे दिसत होते.

बैलाला चरबी जास्त होती. कातडं सोलायला वेळ लागला. पण कातडं आख्खंच्या आख्खं निघालं म्हणून परशा खुश झाला. त्याने कातडं जुन्या तरब्यात गुंडाळून नीट ठेवलं. आता फक्त मांसाचा लगदा व हाडाचा सापळा उरला होता.

पिंपळावर गिधाडे व बाजूला कुत्री या प्रकाराकडे डोळे लावून बसली होती.

परशने सपासप धडाचे तुकडे केले. सगळा शेलका माल एका पिशपीत भरला. गुर्दा, कलेजा, फोफीस, भेजा, दालफाड, जिगरी, डल्याचं मोठं तुकडे, सीना, लुकानु, खुरं, मांदं, गुडसंदार पाच टोनं.

हा माल कुठंही शिजवायचा. दोन चार दिवस मन भरून खायचं. उरलेल्य मालाचे वाटे करून परशूने ते पाच जणेत वाटले. परशाने

कातडं कलालाला पिकायचं. गनध्या व आंब्याने खाटकाकडे सागुती विकायची. आलेले खारपं म्हणजं पैसे सगळयानी पाटून घ्यायचे. उरलेल्या सांगाडयावर कुत्री, गिधाडं, घारी, कावळे तुटून पडले. समोरचा म्हसोबा शांतपणे सगळं बघत होता.

हा सगळा काय प्रका आहे ? ही दुर्बुद्धी माणसाच्या मनात येते तरी कशी? हे हैवानासारखं वागणं किती जन्म असच चालणार? देवाच्या घुळीला या पाच हैवानांनी अशा रीतीने ठार मारले. मेजवानी केली. चैनबाजी केली ८ मज्जा मज्जा मानली.

सकाळी बाव उठले तेव्हा झाडाला बांधलेला घुळी गायब झालेला पाहून सगळयांना कोडंच पडलं. पण घुळी कुठे गेला हे कोडं कधी सुटलंच नाही इतक्या शिताफीने पाच हैवानांनी सगळं काम केलं.

Scanned with CamScanner

## 2. बीभत्स

गिरणीतला माल चोरून विकायचा धंदा करायचे. भैरूबाने व येडयाने बंडू जालिंदरयाने फसवले म्हणून त्याच्या घरात कौले काढून त्याचे सगळे गबाळ लुटून नेले होते.

केवळ दरोडेच नव्हे तर खून, मरामारी करणे हा काहीचा नेहमीचाच जीवनाचा भाग होता. भीमण्णा मुत्याचा पोरगा नाग्याचा खून करून कोणीतरी प्रेत विहिरीत टाकले होते. तर चेडिप्पाच्या पोटात वारंवार रामपुरी फिरवत फिरवत सिरप्याने त्याचा भीषण खून केला होता. सिरप्याच्या चेहरयावर भीतीचा लवलेशही नव्हता. बायको सुब्बा पांचाळ सिददपपाकडे राहिली म्हणून बेडर हनुमंताने तिचे नाकच कापले.

किकरी मांगांनी मादिग मांगांच्या व मादिगांनी किकरींच्या पोरी पळवणे, डुकरे चोरणे हे नित्याचेच होते. काही बायकाही नवरा आवडत नाही म्हणून दुसरया पुरूषाकडे स्वखुशीने राहताना या कादंबरीत आढळतात.

अंधश्रद्धा हा मांगांचा विशेष या कादंवरीत ठळक केला आहे. या अंधश्रद्धेमुळेच पोतू आरमू सारखा भयानक विधी विाळीत बलिप्रतिपदेला आविासी मादिगांनी केला. बाळमेंढीचा बळी देताला तर बाबण्णाने त्याची मान दाताने फोडली. नंतर महाकाय रानरेडयाचा बळी दिला. हा सगळा

विधी बीभत्स रसाने ओतप्रोत भरलेला व तेथील बायकांनाही न बघवणारा असाच आहे.

Scanned with CamScanner

## 3. करूण

सुंभ आणि पीळ या कादंबरीत लेखे ल. सि. जाधव यांनी मांग समाजाचे यथास्थित चित्र उेी केले आहे. मांग समाजाच्या अंधश्रद्धा, सण उत्सव, हर्षमर्ष, प्रेमव्देष, अडाणीपण, अज्ञान सगळे यात सामावले आहे.

बाबूलाला न्हावी पारावर बसून हजामती करायचा आणि गोष्टी खुलवून फुलवून सांगायचा. हा त्याचा एक प्रकारचा दरबारच होता म्हणाना. लोकांनाही त्याचे म्हणणं ऐकताना मोठी करमणूक वाटायची. या बाबूनानाने एक दिवस मांग म्हणजे मांगच. लय खतरनाक दरोडे घालायचे. असं म्हणून बाबूनानाने खंडुबाच्या मांगोबाची कथ्रा सांगितली.

बाळंगावचा पाटील फार मोठी असामी होता. शेकडो एकर शेती होती. सात गावात बघायला मिळणर लाही असा मोठा वाडा होता. पोरं, सुना, भाउबंद असा मोठा परिवार वाडयात राहत होता. पाटलाचा फार थाट होता.

या पाटलाचा सर्वांत जवळचा, विश्वासू गडी होता मांगाचा रामोशी. घारीसारखा हा रामोशी. पाटल्याच्याबरोबर सतत फिरत असायचा. रामाशी दहा माणसाला भारी असा मेहनत केलेला पण फार इमानी होता. खांद्यावर फरशी कुरहाड असायची. रात्री पाटील उजव्या ढेलजेत झोपायचे तर हा डाव्या ढेलजेत झोपायचा.

Scanned with CamScanner

एकदा पाटलांनी सोगितले की माझया जिवावर कोणीतरी उठलय. आज रात्री ते माझा घात करणर आहेत.

मंगाने क्षणभर विचार केला अन म्हणाला, धनी, घाबरू नका. म्या तुमचं अन्न खाल्लं हाय. आज ढेलजेत तुमच्या जागी म्या झोपतो अन माज्या जागी तुमी झोपा.

पाटलाने त्याची समजूत काढायचा प्रयत्न केला. पण तो ऐकेना. शेवटी रात्री पाटलाच्या जागी मांग झोपला.

तो रात्रभर सावध होता. जागा होता. पण कोणीच आलं नाही. कुठं कुत्र ओरडल नाही. गाव शांत झोपलं होतं. पहाटेचे गार वारे सुटले तेव्हा त्याच्या डोळयांवर झापड येउ लागली. क्षणात मांग गाढ झोपला.

अचानक कडब्याच्या गंजीत आधीच लपून बसलेले चौघे मारेकरी पाटील समजून मांगरवर सपासप वार करू लागले. तो बेसाावध होता. त्याला हूं का चूं करता आलं नाही. घात मालक घात एवढच तो ओरडला. त्याला मारून मारेकरी कधी पसार झाले तेही कळालं नाही.

तोवर वाडा जागा झाला. काय गडबड झाली म्हणून सगळे गोळा झाले. सगळी ढेलज रक्ताले नहाली होती. थराराक खून झाला होता. पाटलाला रडू आवरेला. पाटलाने जवळ जाउन मांगाचे पाय शिवले. आपल्यासाठी अल गावासाठी जीवाच बलिदान देणारा मांग धन्य आहे.

Scanned with CamScanner

मांगाची मयत पाटील मराठयाने केली. महात्मा मांगुबा म्हणून त्याची समाधी बांधली. मोठं मंदिर उभारलं. पाटलाचे सारे वारस आजही मांगुबाची पूजा करतात. बाळयात खंडुबाचे अन मांगुबाचे दर्शन घेतातच.

ही कथा ऐकून सगळे भारावून गेले. ओटयावर बसलेली पोरे तर भान हरपून बसली. कितीतरी पोरे दुसरी दिवशी आवर्जून मांगुबाच्या समाधीचे दर्शन घेउन आली.

अशी ही खंडुबाच्या मांगोबाची कथा बाबूनानाने सांगितली.

Scanned with CamScanner

## 4. वीर

सुंभ आणि पीळ या कादंबरीत लेखे ल. सि. जाधव यांनी मांग समाजाचे यथास्थित चित्र उीी केले आहे. मांग समाजाच्या अंधश्रद्धा, सण उत्सव, हर्षमर्ष, प्रेमव्देष, अडाणीपण, अज्ञान सगळे यात सामावले आहे.

दसरा, दिवाळी, रामनवमी या बरोबरच हनुमान जयंतीही मांगुडयात साजरी होत असे. कारण मादिग मांगांना बनशंकरीतजागा मिळाल्याबरोबर एका पारावर त्यांनी मारूतीरायाची सीापना केली होती. हनुमान जयंतीला मोठया काहिलीत प्रसादाची खीर श्जिायची. स्वत पाटील शिवशीव न मानता मांगांनी बनवलेल्या खिरीचा प्रसाद आवडीने चाात. दुपारी मोकळया रानात कुस्त्यांचा फड भरायचा दृ लांबलांबच्या तालमीतले पहिलवान, कुस्ती शौकीन दरसाली यायचे. फड गाजायचा.

यंदाही मंडळींनी पोटभरून खीर खाल्ली. मग कुस्त्या सुरू झाल्या. आयवळे खलिपाच्या हस्ते जोड लावून उदघाटन केले. शेवटची मोठी कुस्ती होती एकशे एक रूपयाची. बालेगावचा पैलवान बाळू चंदू माने उठला. आखाडयात गोल फिरु लागला. त्याला बझ्रून कुणी जोड तयारच होईना. तो खास दमदार गडी होता. जोड मिळाला नाही तर कुस्ती न खेळताच त्याला बक्षीस मिळाणार अशी कुजबुज सुरू झाली.

Scanned with CamScanner

सिरप्या, परश्या आणि दोस्त कुस्तीची मजा बघत बसले होते. परशाने सिरप्याला हुसकावलं. उठ सिरप्या. मांगुबा पाठीशी हाये. काय व्हईल ते व्हईल. तो शिस्तीन डाव टाकनार. तू आडमुठा खेळ कर तो गोंदळून जरईल. तु घुळी धरला होता ना? हा बी घुळीच समज.

सिरप्याच्या अंगात वीज सळसळली. अंगात सात मांगुबाच बळ आलं. तो उठला. खलिपाने त्याला काही डावपेच सांगितले. हा काण पैलवान? कदी बगितला न्हाय? असं बालेगावची मंडळी म्हणू लागली. सगळे सिरप्याकडं बघून नाकं मुरडू लागलं. कुस्ती सुरू व्हयच्या आधीच बानेगावचे लोक कुस्ती जिंकल्याचा आनंद करू लागले.

बाळू पैलवान होता खूराक खाल्लेला दमदार गडी. पण सिरप्याही कमी नव्हता. डबल हाडाचा थोराड ताकदीचा व रामुसपणाच भरपूर खाल्लेला गडी होता.

कुस्ती सुरू झाली. अचानक काय झाल कुणास ठाउक. डोळयाच पात लवतं न लवतं तोच चपळाईने सिरप्या बाळू पैलवानाच्या पटात घुसला. टांग मारून हानुमंती कुस्तीचा डगबेडी डाव मारला. बाळू पैलवानाला आसमान दाखवलं. चीत केलं. आयवळे खलिपाने जो डाव इथेच सांगितला तोच त्याने केला व कुस्ती जिंकली.

आपण कसे चितपट झालो हेच बानेगावच्या पैलवानाला कळालं नाही. सगळा हलकल्लोळ उठला. मुबाचा इजय असो. जय मल्हार.

Scanned with CamScanner

येळकोट घे असं सगळे ओरडू लागले. बानेगावचा पैलवान रडू लागला. खलिपाने त्याची समजूत काढली.

सगळे आखाडयात नाचू लागले. खलिपाने या गोधळातच बक्षीस व नारळ दिला. गळयात हार घातला. मिठी मारली व म्हणाला, शाब्बास भाददर मांगा. जातीचं नााव राखलंस.

सिरप्याला वाजत गाजत मिरवत मुख्य हनुमानाच्या पाया पडायला आणलं. सिरप्या मेंबर केरू रामाच्या पाया पडला.

आज आनंदाचा दिवस होता. सगळेच दिवस दळिंद्री नसतात. असाही दिवस मांगुडयात उगावतोच.

असा हा मांगुडयातला हनूमान जयंतीचा कुस्त्यांचा फड. सिरप्याने कुस्ती जिंकून मांगुडयाला आगळावेगळा आनंद मिळवून दिला.

Scanned with CamScanner

## 5. क्रोध

बनशंकरी गावाजवळ वैकुंठस्मशानभूमी होती. ती दुसरी कडे हलवली व तिथे मांगुडा उभा राहिला. इथे काही झाडे होती. बाबूनाना हा किकरी नीवीही इथे आला. त्याच्या घरासमोर करंजाचे मोठे झाड होते. त्याने या झाडाला ओटा बांधला.

बाबूनाना न्हवी ओटयावर बसून हजामती करायचा आणिी गोष्टी खुलवून फुलवून सांगायचा. हा त्याचा एक प्रकारचा दरबारच होता म्हणाना. लोकांनाही त्याचं म्हणणं ऐकताना मोठी करमणूक वाटायची. लफडी, भानगडी, किस्से सांगत सगळे वेळ घालवायचे. बाबूनाना बोलत बोलत काम करायचा आणि माणसांना गुंतवून ठेवाया. सगळया भानगडी या ओटयावर चघळल्या जायच्या.

मुलगा नाग्या, सून गौरव्वा अन् नात शारदा यांच्या सह स्वत च्या घरात राहायचा.भीमण्णा मुत्या त्याच्या शेजारी राहायचा. तो मेल्यावर बाबण्णा देवारूषी व जकव्वा तेथे घर बांधून राहू लागले. पण या देवरूषाला जागा देउन बाबूनाना पस्तावला होता. लोकांलाही हे देवरूषी इथे राहायला आले ते आवडले नव्हते.

मार्गशीर्ष महिन्यात शेवटच्या रविवारी बाबूनाना सगळयांना घेउन खंडोबाला गेला. मनाप्रमाणे देवदेव केला. सगळे घरी आले. पण

Scanned with CamScanner

त्यादिवशी अमावस्या होती. एवढा देवधर्म करून बाबूनानाला उदास वाटू लागलं.मांगुडा स्मशानासारखा वाटू लागला.

रात्री नाग्या दारू पिउन आला. बाबूनाना त्याला रागावले व झोपले. नाग्या पिउन ल्हास होउन आला तो एकाएकी घरात घुसला त्याने अंगावरचे सगळे कपडे काढले. घरात अंधार होता. गौरव्वा नेमकी कुठे झोपली ते त्याला कळेना. अंदाजानेच तो तीच्या पांघरूणत घुसला. ती ओरडू लागली तेव्हा त्याने तिच्या तोंडावर हात दाबून धरला. थोडया वेळाने तो बाजूला आला तेव्हा शारदा आयो म्हणत कण्हू लागली. तेव्हा गौरव्वा जागी झाली. काय घडलं ते तिला समजलं व आवो ही तूमची शारदी की वो, काय केलं तुमी असं ती म्हणाली.

माझया नातीच्या नशिबात बापाचा भोग का होता ? आता आपल्या आयुष्याची घडी कधीच बसणार नाही असा विचार बाबूनाना सतत करायचा. त्याचा न्हाव्याचा व्यावसाय बंद झाला. लोकांनी त्याला वाळीतच टाकलं.

एक दिवस बाबूनाना मरून गेला.

बबूनाना नाग्या, गौरव्वा, शारदी सगळयांचा हा खेळ दैवाचा होता का कर्माचा? या प्रश्नाला उत्तरच नव्हते.

Scanned with CamScanner

## 6. भय

मांग समाजाचे अंधश्रद्धेचे भयानक वर्णन या कादंबरीत केले आहे. या अंधश्रद्धेत पोतू आरमू सारखा विधी आहे आणि भीमण्णाखे भूत झाले या चित्रणातून भुताखेताचा या समाजावर असणारा प्रभावही शब्दबद्ध झाला आहे.

भीमण्ण मुत्याचा पोरगा नाब्याचा खून झाला आणि भीमण्णा मुत्याचे फार हाल झाले. तूघरात मरून पडला तरी कोणाला समजले नाही. घाण वास सुटला. मुंग्या लागल्या. त्याचे दोन्ही डोळे मुंग्यानी खाउन टाकले होते. उघडया तोंडातले दोन चार हात भेसून दिसत होते. त्याचे ते भयानक रूनप पाहून सगळे घाबरले. या भीमण्णालना मांगांनी जाळले खरे. पण्रा त्याचे कोणतेच विधी झाले नाहीत. माती सावडली नाही. कावळा शिवला नाही. घस दाखवला नाही. माळही लावली नाही.

म्हणून भीमण्णा भूत किंवा रामगा होउन मांगुडयात भटकणार अशी सगळयांना शंका होती अन् भीती वाटत होती. अफवा पसरू लागल्या होत्या. करंजाचं किंवा पिपरीचं झाड हललं किंवा अंधारात काही हललं तरी लोकंना त्यात भीमण्णाख खे्हरा दिसू लागला. भीमण्णा बाबूनानाच्या घरात राहत होता. म्हणून बाबूनानाच्या घरासमोर जायचे लोक टाळू लागले. रात्री जायची हिंमत तर कोणीच करत नव्हतं.

Scanned with CamScanner

सगळयांना भास होउ लागले भीमण्णा मुत्या मध्यरात्री केरसुणीचे मुडगं बांधत दारात बसतो. फउं सरकत उभा राहतो. हे झाल रात्रीचं. पण दिवसा जरी कोणी त्याच्या दारावरून गेलं तरी भीमण्णा विचारतो, ये माज्या नाग्याला बगितला का रं? असं लोकांला वाटू लागलं.

बाबूनानची तर कंबरच हाबकली. समोरच्या झाडावर कावळा काव काव करू लागला तरी तो भीमण्णा मुत्या आहे असं बाबूनानाला वाटू लागलं.

नारयाने बाबूनानाला सांगितलं, दिवाळीत भीमण्णा दारात कानवल्यातला बाकर सांडून पुन्हा भरत होता. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अमावस्येला त्याच्या दारात केरसुण्या विकत बसला होता. भीमण्णा रातच्याला निघतो हे लय लोकांनी बगितलयं.

बाबूलनाना वरवर म्हणाला, भाडया कायतरी सांगतुस. पण तो मनातूर फार हादरला.

या हदरण्यातूनच देवरूषी बाबण्णा अन् जकव्या अम्माच फावलं अन् भीमण्णाच्या घरात त्यांनी देव्हारा केला व देवरूषीपण करू लागला.

Scanned with CamScanner

## 7. शृंगार

आण्णांनी मांगुडयात एक बैठक बोलावली. बाबासाहेबाच्या बैठकीची सगळी माहिती दिली. ते म्हणाले, देश स्वतंत्र होउन दहा वर्ष झाली. पण आपण आहो तिथंचा आहोत.मुलं शिकत नाहीत. भेदाभेद कडक आहे.आपण देवळात जाए शकत नाही. साने गुरूजींनी उपोषण केलं पण काहीच फायदा नाही. हे गावकुसाबाहेरचं जिण आता बास झाल. आपण अजून पोतराज सोडतोच. रानरेडा कापण्यासारखा रानटी प्रकार करतोच. बाबण्णा देवरूषी नेमका आपल्याच गावात येउन राहिला. आपण वरचेवर मागे मागेच चालतोच. आपल्या वस्तीला लागून मोठं मैदान आहे. तिथं शाळा बाधायचा अर्ज आपण म्युनिसिपालटीत देउ. मुबईत मी गेलो. तिथं एक मोठा निर्णय झाला. बाबासाहेबाचा मी कार्यकर्ता आहे. त्याच्यामुळें आपल्याला सवलती मिळाल्या सत्तेत सहभ्‍भाग मिळाला. ते दसरयालया बुद्ध धर्म स्वीकारणार आहेत. आपणही सगळयानी धर्मांतर करायचं आहे. मातंगानीही धर्मांतर कराव असा बाबासाहेबांचा संदेश आहे. कोणकोण येणर त्यानी माझयाकडे नावे द्या.

सगळयांनी भाषण शांतपणे ऐकलं. पण हिंदुधर्म सोडायचा विषय आला तोव्हा चुळबुळ सुरू झाली. जणू बॉम्बच टाकला. काय

Scanned with CamScanner

बोलावं कुणाला कळोना. सिदाराम मास्तर, बाबूनाना, खलिपा , रंदवे बुवा, मोरे मास्तर... अनेकांनी आपले विचार मांडले. धर्म बदलायचा विचार इतक्या पटकन सांगता येणर नाही तेव्हा काही दिवस विचार करायला द्यावेत असं सगळयांच मत पडलं. शाळा बांधायचा विचार सगळयांना पटला.

Scanned with CamScanner

## ४. हास्य

सुंभ आणि पीळ या कादंबरीत लेखे ल. सि. जाधव यांनी मांग समाजाचे यथास्थित चित्र उंी केले आहे. मांग समाजाच्या अंधश्रद्धा, सण उत्सव, हर्षमर्ष, प्रेमव्देष, अडाणीपण, अज्ञान सगळे यात सामावले आहे.

दसरा, दिवाळी, रामनवमी या बरोबरच हनुमान जयंतीही मांगुडयात साजरी होत असे. कारण मादिग मांगांना बनशंकरीतजागा मिळाल्याबरोबर एका पारावर त्यांनी मारूतीरायाची सीपना केली होती. हनुमान जयंतीला मोठया काहिलीत प्रसादाची खीर श्जियचची. स्वत पाटील शिवशीव न मानता मांगांनी बनवलेल्या खिरीचा प्रसाद आवडीने चाात. दुपारी मोकळया रानात कुस्त्यांचा फड भरायचा दृ लांबलांबच्या तालमीतले पहिलवान, कुस्ती शौकीन दरसाली यायचे. फड गाजायचा.

यंदाही मंडळींनी पोटभरून खीर खाल्ली. मग कुस्त्या सुरू झाल्या. आयवळे खलिपाच्या हस्ते जोड लावून उदघाटन केले. शेवटची मोठी कुस्ती होती एकशे एक रूपयाची. बालेगावचा पैलवान बाळू चंदू माने उठला. आखाडयात गोल फिर लागला. त्याला बझून कुणी जोड तयारच होईना. तो खास दमदार गडी होता. जोड मिळाला नाही तर कुस्ती न खेळताच त्याला बक्षीस मिळाणार अशी कुजबुज सुरू झाली.

Scanned with CamScanner

सिरप्या, परश्या आणि दोस्त कुस्तीची मजा बघत बसले होते. परशाने सिरप्याला हुसकावलं. उठ सिरप्या. मांगुबा पाठीशी हाये. काय व्हईल ते व्हईल. तो शिस्तीन डाव टाकनार. तू आडमुठा खेळ कर तो गोंदळून जरईल. तु घुळी धरला होता ना? हा बी घुळीच समज.

सिरप्याच्या अंगात वीज सळसळली. अंगात सात मांगुबाच बळ आलं. तो उठला. खलिपाने त्याला काही डावपेच सांगितले. हा काण पैलवान? कदी बगितला न्हाय? असं बालेगावची मंडळी म्हणू लागली. सगळे सिरप्याकडं बघून नाकं मुरडू लागलं. कुस्ती सुरू व्हयच्या आधीच बानेगावचे लोक कुस्ती जिंकल्याचा आनंद करू लागले.

बाळू पैलवान होता खूराक खाल्लेला दमदार गडी. पण सिरप्याही कमी नव्हता. डबल हाडाचा थोराड ताकदीचा व रामुसपणाच भरपूर खाल्लेला गडी होता.

कुस्ती सुरू झाली. अचानक काय झाल कुणास ठाउक. डोळयाच पात लवतं न लवतं तोच चपळाईने सिरप्या बाळू पैलवानाच्या पटात घुसला. टांग मारून हानुमंती कुस्तीचा डगबेडी डाव मारला. बाळू पैलवानाला आसमान दाखवलं. चीत केलं. आयवळे खलिपाने जो डाव इथेच सांगितला तोच त्याने केला व कुस्ती जिंकली.

आपण कसे चितपट झालो हेच बानेगावच्या पैलवानाला कळालं नाही. सगळा हलकल्लोळ उठला. मुबाचा इजय असो. जय मल्हार.

Scanned with CamScanner

येळकोट घे असं सगळे ओरडू लागले. बानेगावचा पैलवान रडू लागला. खलिपाने त्याची समजूत काढली.

सगळे आखाडयात नाचू लागले. खलिपाने या गोधळातच बक्षीस व नारळ दिला. गळयात हार घातला. मिठी मारली व म्हणाला, शाब्बास भाददर मांगा. जातीचं नाव राखलंस.

सिरप्याला वाजत गाजत मिरवत मुख्य हनुमानाच्या पाया पडायला आणलं. सिरप्या मेंबर केरू रामाच्या पाया पडला.

आज आनंदाचा दिवस होता. सगळेच दिवस दळिंद्री नसतात. असाही दिवस मांगुडयात उगावतोच.

असा हा मांगुडयातला हनूमान जयंतीचा कुस्त्यांचा फड. सिरप्याने कुस्ती जिंकून मांगुडयाला आगळावेगळा आनंद मिळवून दिला.

Scanned with CamScanner